| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आरबी-१/डेस्क-२/टे-४/सिआर- | दिनांक १६.०३.२०२० |


प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड

२) कुलसचिव, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट

४) सहसंचालक, उच्च शिक्षण अनुदान, नांदेड

५) प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, पदवी, पदवित्तर संस्था (मार्फत सहसंचालक, उच्च शिक्षण अनुदान, नांदेड)

६) प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था शासकीय/निमशासकीय जि.नांदेड

७) शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक), नांदेड

**विषयः-** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याबाबत. (नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील सर्व शासकीय व खाजगी शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत).

**संदर्भः-**१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे खंड २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०

४) या कार्यालयाचे समक्रमांकीत पत्र दिनांक १५.०३.२०२०.

५) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

६) या कार्यालयाचे समक्रमाकीत आदेश दिनांक १५.०३.२०२०

विषयांकीत प्रकरणात या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.०४ व ०६ नुसार नांदेड जिल्हयातील महानगरपालिका व सर्व नगरपालिका, सर्व नगरपंचायत क्षेत्रातील व शहरी हद्दी लगतच्या सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे तसेच, यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत निर्देश दिले आहेत.

Scanned by CamScanner

तथापि ब-याच प्रमाणात शैक्षणिक संस्था हया ग्रामीण क्षेत्रात आहेत तसेच, सदर शैक्षणिक संस्थामध्ये निवासी विद्यार्थी वस्तीगृहे ही आहेत. त्याच बरोबर या शैक्षणिक संस्थामध्ये दैनंदिन स्वरुपात शहरी व ग्रामीण भागातुन विद्यार्थी येत जात असल्याने या ठिकाणी कोविड विषाणूचा प्रार्दुभाव होण्याची दाट शक्यता असल्याने अशा ग्रामीण क्षेत्रात असलेल्या शैक्षणिक संस्था दि.३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवणे आवश्यक आहे.

त्यानुसार मी नांदेड जिल्हयातील **ग्रामीण क्षेत्रातील सर्व शासकीय व खाजगी शैक्षणिक संस्था देखील** दि.३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश देत आहे.

तसेच, सदर ठिकाणी इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षा तसेच विद्यापीठाचे प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळा पत्रकानुसार घेण्यात यावे असेही निर्देश आहेत त्याच प्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यकती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सुचना देखील आहेत.

वरील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास वेळोवेळी सादर करावा. सदर कामाच्या अंमलबजावणीत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून हलगर्जीपणा निदर्शनास आल्यास संबंधितांविरुध्द कार्यवाही करुन/कार्यवाहीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

स्वा/-
(डॉ. विपीन इटनकर) भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

३) पोलीस अधीक्षक, नांदेड
४) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
५) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

Scanned by CamScanner